# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय,

प्रशासकीय इमारत,१०वा मजला,शासकीय वसाहत,वांद्रे (पू.),मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी:२६५५६७९९ फॅक्स:२६५५६८०५ E Mail collectormsd@gmail.com

क्रमांक : सो/कार्या : संगायो/कावि- जैव कचरा समिती /२०१९
दिनांक : ०३/०८/ २०१९

**वाचले :** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील परिपत्रक क्रमांक : संकिर्ण २०१७/प्र.क्र. ४४/आरोग्य ३ दिनांक ०४/०४/२०१९

---

**: आदेश :**

जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ मधील नियम ११ (११) नुसार अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३ दिनांक १३/०४/२०१९ नुसार मान्यता दिली होती. जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरीत्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहिल असे या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने या संदर्भात शासन परिपत्रक दिनांक ०४/०४/२०१९ अन्वये जैव- वैद्यकीय कचरा अधिनियम , २०१६ अंतर्गत जिल्हास्तरावर कामकाज पाहण्यासाठी मुंबई उपनगर जिल्हयासाठी पुढील प्रमाणे समिती स्थापन करण्या येत आहे.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २. वैद्यकीय अधिक्षक, मालवणी रुग्णालय | - सदस्य |
| ३. उप आयुक्त, महानगरपालिका | - सदस्य |
| ४. मुख्य आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबईउमहानगरपालिका | - सदस्य |
| ५. प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदुषण नियंत्रण मंडळ | - सदस्य सचिव |
| ६. इंडीयन मेडीकल असोशिएशन | - प्रतिनिधी |

सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असेल

१. जैव- वैद्यकीय कचरा अधिनियम , २०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.
२. समितीची त्रैमासिक बैठक घेणे.
३. मुंवई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट – १९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
४. खाजगी व शासकीय रुग्ण्यालयाचा जैविक वैद्यकीय नोंदणीबाबत आढावा घेणे.
५. रुग्ण्यालयांत किती जैविक वैद्यक कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते आबाबत आढावा घेणे.
६. जैविक वैद्यक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatment & Desposal facility याचा आढावा घेणे.
७. जैविक वैद्यक कचरा बाबत शासकीय व खाजगी रुग्ण्यालयांच्या अडीअडचणी जाणुन घेणे.

Scanned with CamScanner

८. जैविक वैद्यक कचऱ्याच्या साठवणुक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाययोजनांबाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.
९. क्षेत्रिय भेटी देऊन पाहणी करणे.
१०. जैविक वैद्यक कचरा बाबत इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा व निर्णय घेणे

(सत्यनारायण बजाज)
उपजिल्हाधिकारी, (साप्र)
मुंबई उपनगर जिल्हा

स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.

प्रत :१. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महानगरपालिका इमारत, फोर्ट, मुंबई
२/- यांना विनंती करण्यात येते की सदर समितीवर उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे नामनिर्देशन आपले स्तरावरुन करणेस विनंती आहे.
२. वैद्यकीय अधिक्षक, मालवणी रुग्णालय
३. मुख्य आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
४. प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदुषण नियंत्रण मंडळ
२/- आपणास कळविण्यात येते की सदर समितीवर इंडीयन मेडीकल असोसिएशन संस्थेच्या प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची असलेमूळे आपण सदर असोसिएशनशी संपर्क साधून त्यांचा एक प्रतिनिधी नामनिर्देशित करावा.

Scanned with CamScanner